नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ५२ Issue - 52 | वार बुधवार दि. ९ जुलै २०२५ Blow- Wednesday Date 9 Jully 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## महाराष्ट्रात मराठीसाठी आंदोलन करणे दुर्दैव

### आंदोलक कार्यकर्त्यांची भावना; शांततेत निघाला मराठी स्वाभिमान मोर्चा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मीरा रोडमध्ये मराठी भाषेवरून सुरू असलेल्या संघर्षाला मनसेने मोर्चाने उत्तर दिले. एका दुकानदाराला मराठी बोलण्यास जबरदस्ती करून मारहाण केल्याचा आरोप मनसेवर होता, तर मनसेचे म्हणणे होते की जोधपूर स्वीट्सच्या व्यापाऱ्याने मराठीविरोधात उर्मटपणे भाषा वापरली. या घटनेचा व्हिडिओ व्हायरल झाला होता. यानंतर व्यापाऱ्यांनी ३ तारखेला बंद पाळून मीरा भाईंदरमध्ये मोर्चा काढला. या मोर्चाला भाजपचा पाठिंबा असल्याचा आरोप मनसेने केला. मनसेने ८ तारखेला व्यापाऱ्यांच्या मोर्चाला उत्तर देण्यासाठी मोर्चा काढण्याची घोषणा केली. अविनाश जाधव यांनी ही घोषणा केली. मराठी एकीकरण समितीने या मोर्चाला पाठिंबा दिला. पोलिसांनी



मनसेच्या मोर्चाला परवानगी नाकारली आणि मीरा भाईंदरमधील सर्व फलक उतरवले. मनसैनिकांना आणि ठाकरेंच्या शिवसैनिकांना नोटिसा पाठवण्यात आल्या. पहाटे तीन-साडेतीनच्या सुमारास अविनाश जाधव यांच्यासह मनसेच्या नेत्यांना ताब्यात घेऊन स्थानबद्ध करण्यात आले. अविनाश मला हे सगळं माहिती आहे पण माझ्यावर खूप दबाव आहे तुला इथून घेऊन जाण्याच्या बाबतीत, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. मुख्यमंत्री फडणवीसांनी मनसेला जबाबदार धरले, संघर्ष होईल असा मार्ग मोर्चेकरी जाणीवपूर्वक मागत होते असे त्यांचे म्हणणे होते. मनसेने मात्र हे आरोप फेटाळले. अखेर, त्याच मार्गावर मोर्चाला परवानगी मिळाली आणि मनसैनिकांनी व ठाकरेंच्या शिवसैनिकांनी साथ दिल्याने मोर्चा शांततेत पार पडला. सकाळी स्थानबद्ध केलेले कार्यकर्तेही सुटका झाल्यावर आंदोलनस्थळी पोहोचले. या प्रकारामुळे महाराष्ट्रात मराठीसाठी आंदोलन करणे दुर्दैव असल्याचे मत व्यक्त झाले. बिहार आणि महानगरपालिकेसाठी हा मुद्दा तापवला जात असल्याचा आरोपही झाला. मराठी अस्मितेचे नुकसान होऊ नये याची काळजी सर्वपक्षीय नेत्यांनी घ्यावी अशी अपेक्षा व्यक्त झाली.

## उद्या भारत बंदची हाक, २५ कोटी कामगार आंदोलनात उतरणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




नवी दिल्ली: देशातील १० केंद्रीय कामगार संघटनांनी भारत बंदची हाक दिलेली आहे. उद्या भारत बंदची घोषणा करण्यात आलेली आहे. कामगार आणि शेतकरी संघटना भारत बंदमध्ये सहभागी होणार आहेत. केंद्र सरकारची मजूर, कामगारविरोधी धोरणं, शेतकऱ्यांच्या विरोधातील आणि कॉर्पोरेट्सची तळी उचलणारी धोरणं याविरोधात ९ जुलैला भारत बंदची हाक देण्यात आलेली आहे. सरकारकडून आर्थिक आणि कामगार कायद्यांमध्ये सुधारणा करण्याच्या प्रयत्नात आहे. त्यामुळे मजुरांचं अधिकार आणखी मर्यादित होतील. व्यापार करण्याची प्रक्रिया सुलभ करण्याच्या नावाखाली सरकार सर्वसामान्यांना नाडत असल्याचा आरोप संघटनांचा आहे.

उद्या होणाऱ्या बंदमध्ये देशभरातील २५ कोटी कामगारांचा सहभाग असेल. बँकिंग, खाणकाम, पोस्टल सर्व्हिस, बांधकाम यांच्यासह विविध क्षेत्रातील कामगार बंदमध्ये सहभागी होणार आहेत. २५ कोटी कामगार बंदमध्ये सहभागी होणार असल्यानं देशातील महत्त्वाच्या सेवांवर परिणाम होण्याची शक्यता आहे. १० प्रमुख देशव्यापी कामगार संघटनांनी भारत बंदची हाक दिलेली आहे. त्यासोबत या संघटनांच्या संबंधित अन्य कामगार संघटनादेखील बंदमध्ये सहभाग नोंदवणार आहेत. केंद्र सरकार कामगार, शेतकरी विरोधी धोरणं राबवत असल्याचा आरोप संघटनांनी केला आहे. सरकारी धोरणांचा लाभ केवळ उद्योगपती आणि त्यांच्या व्यवसायांनाच होत असल्याचा संघटनांचा दावा आहे.

**'भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची'** — **विविध माध्यमांतून आरोग्य जनजागृती**

## सार्वजनिक आरोग्य विभागाने वारी मार्गावर पुरविली ९ लाखांहून अधिक वारकऱ्यांना आरोग्य सेवा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर - आषाढी एकादशीनिमित्त देहू-आळंदी ते पंढरपूर व इतर जिल्ह्यांतून आलेल्या वारकरी भक्तांना सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत 'भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची' या उपक्रमांतर्गत ९ लाखांपेक्षा अधिक वारकऱ्यांना विनामूल्य आरोग्य तपासणी आणि औषधोपचारात्मक आरोग्य सेवा पुरविण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर आणि आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली या विशेष उपक्रमाच्या माध्यमातून आरोग्य विभागाने ९ लाख २३ हजार ५०९ वारकऱ्यांना आतापर्यंत आरोग्य सेवा पुरविली असून, परतीच्या वारीमध्येही दि. १० जुलैपर्यंत विभागामार्फत वारकऱ्यांना आरोग्य सेवा पुरविण्यात येणार आहे. पालखी मार्गावर १०८ क्रमांकाच्या रुग्णवाहिकेमार्फत आतापर्यंत एकूण १,११४ वारकऱ्यांना अत्यावश्यक आरोग्य सेवा पुरविण्यात आलेली आहे. त्यामुळे या वारकऱ्यांना जीवनदान मिळाले आहे.



संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज, जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज यांच्या पालखीसह राज्यातील विविध जिल्ह्यांतून आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरला निघालेल्या संतांच्या पालख्या आणि दिंड्यांमध्ये सहभागी झालेल्या लाखो वारकऱ्यांना रस्त्यात काही त्रास जाणवला की लगेच उपचार मिळावेत, यासाठी आरोग्य विभागाने 'भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची' या उपक्रमाच्या माध्यमातून वारकऱ्यांना आरोग्य सेवा पुरविली. या उपक्रमाच्या माध्यमातून पालखी मार्गावर आरोग्य विभागातर्फे प्रतिबंधात्मक, उपचारात्मक, आरोग्य संदर्भ सेवा देण्यात आली. ५ चित्ररथांच्या माध्यमातून आरोग्य शिक्षण व जनजागृती करण्यासाठी विभागामार्फत नावीन्यपूर्ण व कल्पक पद्धतीने विविध उपक्रम राबविण्यात आले. वारकऱ्यांना पालखी मार्गावर आणि मुक्कामाच्या ठिकाणी मोफत आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात आली होती. त्यासाठी विभागाचे ४,३७६ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे मनुष्यबळ रात्रंदिवस कार्यरत होते.

पालखी मार्गावर वारीमध्ये डॉक्टर, नर्स, आरोग्य सहायक, आशा, आरोग्य सेवक, शिपाई, सफाईगार अशा सर्व कर्मचाऱ्यांनी सेवा दिली. पालखी मार्गावर वारकऱ्यांच्या सेवेसाठी प्रत्येक पाच किलोमीटर अंतरावर 'आपला दवाखाना' तात्पुरता उभारण्यात आला होता. तातडीच्या आरोग्य सेवेसाठी फिरत्या दुचाकी वाहनासह आरोग्यदूत तैनात ठेवण्यात आले होते. आषाढी वारीमध्ये पालखी मार्गावर मोठी गर्दी असल्याने प्रत्येक ठिकाणी ॲम्बुलन्स फिरू शकत नाही, त्यामुळे फिरते दुचाकी आरोग्यदूत प्रथमोपचार पेटीसह सज्ज ठेवण्यात आले होते. त्यांच्या माध्यमातून वारकऱ्यांना तातडीची आरोग्य सेवा पुरविण्यात आली. याशिवाय १०२ व १०८ या क्रमांकाच्या ॲम्बुलन्सही पालखी मार्गावर सेवा देण्यासाठी कार्यरत होत्या. पालखीमध्ये दिंडी प्रमुखांना आरोग्य कीट देण्यात आली होती. याबरोबरच महिलांसाठी प्रत्येक ठिकाणी हिरकणी कक्षाची सुविधा देण्यात आली. पुणे परिमंडळ, पुणे व पुणे जिल्हा परिषद स्तरावरुन २ आरोग्य पथके सुसज्ज रुग्णवाहिकेसह अविरत पालखी परतेपर्यंत होते .

श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी दरम्यान ३,५६,३८९ वारकऱ्यांना, श्री संत तुकाराम महाराज पालखी दरम्यान २,२९,१८३ तर श्री संत सोपानकाका महाराज पालखी दरम्यान १९,३६४ वारकऱ्यांना आरोग्य सेवा पुरविण्यात आली आहे. मानाच्या इतर पालख्या व दिंड्यांमध्ये ८५,३८६ वारकऱ्यांना आरोग्य सेवा देण्यात आली आहे. पंढरपूर - संस्था व एचबीटी (बूथ) मध्ये ६२,६७० वारकऱ्यांना, पंढरपूर - उपजिल्हा रुग्णालय व ट्रामा आयसीयू.मध्ये ८६,९२२ वारकऱ्यांना तसेच तीन रस्ता शिबिरामध्ये ८३,५९५ वारकऱ्यांना आरोग्य सेवा पुरविण्यात आली आहे. आरोग्य सेवा पुरविण्यात आलेल्या बाह्यरुग्ण संख्या ९,१८,४९९ तर आंतररुग्ण संख्या ५,०१० अशी एकूण ९,२३,५०९ वारकरी भक्तांना आरोग्य सेवा पुरविण्यात आलेली आहे.

**सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत पालखी मार्गावर पुरविण्यात येणाऱ्या आरोग्य सेवेची वैशिष्ट्ये –**

- पालखी सोहळा २०२५ साठी एकूण मनुष्यबळ - ४,३७६
- प्रत्येक ५ किमी अंतरावर 'आपला दवखाना' - २०३
- वारी दरम्यान १०२ व १०८ रुग्णवाहिका २४*७ उपलब्ध - ३३१
- दिंडी प्रमुखांसाठी औषधी कीट - ३५००
- महिला वारकऱ्यांसाठी रुग्णालयामध्ये कार्यरत स्त्री रोग तज्ज्ञ - १५
- पालखी मुक्कामाच्या ठिकाणी हिरकणी कक्ष - ३७
- पालखी मार्गावर आरोग्य दूत - २९०
- पालखी सोबत माहिती, शिक्षण व संदेशवहन चित्ररथ - ५
- पालखी मुक्कामाच्या ठिकाणी ५ बेडची क्षमता असलेले अतिदक्षता कक्ष - ४६
- आरोग्य शिक्षण संवाद आरोग्य ज्ञानेश्वरी उपक्रम.
- विविध माध्यमाद्वारे आरोग्य जनजागृती.
- पालखी मार्गावरील सर्व हॉटेल्स व त्याअंतर्गत असलेल्या कामगारांची आरोग्य तपासणी तसेच पाणी नमुने तपासणी.
- पालखी मार्गावर १८६ टँकरव्दारे शुध्द पाणी पुरवठा व मुक्कामाच्या ठिकाणी धुर फवारणी.
- पाण्याच्या सर्व स्रोतांची ओटी टेस्ट तसेच आरोग्य संस्थांमार्फत जैवकचरा विल्हेवाट.

## हे चालणार नाही; मिरा-भाईंदर मनसे मोर्चा प्रकरणी मुख्यमंत्र्यांकडून भूमिका स्पष्ट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पालघर: मिरा-भाईंदरमध्ये मंगळवारी (८ जुलै) महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या मराठी मोर्चाला पोलिसांनी परवानगी नाकारली नव्हती. मात्र, ठरावीक मार्गावरूनच मोर्चा निघाला तर संघर्ष होईल, त्यामुळे मार्ग बदलण्यात यावा असं पोलिसांनी मनसेला सांगितले होते. मात्र, मनसेने आम्हाला असाच मोर्चा काढायचा आहे, तसाच मोर्चा काढायचा आहे अशी भूमिका घेतली होती. मात्र, असे चालणार नाही, असे स्पष्ट करीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासंदर्भातील भूमिका मंगळवारी स्पष्ट केली आहे.

मिरा-भाईंदर येथे मोर्चासाठी पोलिसांची परवानगी नसली तरी मोर्चा काढण्यावर मनसे ठाम होती. त्यामुळेच पहाटे साडेतीन वाजताच्या सुमारास मनसेचे नेते अविनाश जाधव यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यापाठोपाठ मनसेचे नेते संदीप देशपांडे आणि राजू पाटील यांनाही नोटिसा बजावण्यात आल्या आहेक. पत्रकारांशी संवाद साधताना मुख्यमंत्र्यांनी याबाबत सविस्तर माहिती दिली. 'मनसेच्या मोर्चाला परवानगी का दिली नाही याबाबत मी पोलिसांकडे विचारणा केली. मनसेने ठरवलेल्या मार्गावरून मोर्चा झाला असता तर संघर्ष झाला असता अशी माहिती पोलिसांनी दिली. मार्ग बदलावा असेही मनसेनेच्या पदाधिकाऱ्यांना पोलिसांनी सुचवले होते. मनसेला सभा घ्यायची असल्याचेही पदाधिकाऱ्यांनी सांगितले होते. ती परवानगी त्यांना दिली होती', असेही मुख्यमंत्र्यांनी म्हणाले.

**हे चालणार नाही : मुख्यमंत्री फडणवीस**

'मोर्चा काढण्यासाठी कुणालाही मनाई नाही. पण तुम्ही मार्ग बदला असे पोलिस सातत्याने सांगत होते. कुणालाही मोर्चा काढायचा असेल तर परवानगी मिळेल पण आम्हाला असाच मोर्चा काढायचा आहे तसाच काढायचा आहे असे चालणार नाही', असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

**सावधगिरी / खबरदारीची सूचना**

तमाम लोकांना या सावधगिरी/ खबरदारीची सूचनाद्वारे कळविण्यात येते की,

अक्कलकोट राजघराण्याचे सदस्य, संस्थान स्थापनेपासून खालीलप्रमाणे असून इतर कोणतीही व्यक्ती अक्कलकोट राजघराण्याची सदस्य अथवा वारस नाही.

- श्रीमंत फत्तेसिंहराजे भोसले पहिले
- श्रीमंत महाराज शहाजीराजे पहिले
- श्रीमंत महाराज फत्तेसिंहराजे द्वितीय भोसले
- श्रीमंत महाराज मालोजीराजे प्रथम भोसले
- श्रीमंत महाराज शहाजीराजे दुसरे भोसले
- श्रीमंत महाराज मालोजीराजे दुसरे भोसले
- श्रीमंत महाराज शहाजीराजे तिसरे भोसले
- श्रीमंत महाराज फत्तेसिंहराजे तिसरे भोसले
- श्रीमंत महाराज विजयसिंहराजे फत्तेसिंहराजे भोसले
- श्रीमंत महाराज जयसिंहराजे फत्तेसिंहराजे भोसले
- श्रीमंत राजकुमारी संयुक्ताराजे जयसिंहराजे भोसले
- श्रीमंत राजकुमारी सुनिताराजे जयसिंहराजे भोसले
- श्रीमंत मालोजीराजे तिसरे संयुक्ताराजे भोसले **(सध्याचे राजासाहेब, अक्कलकोट)**

वरील नमूद व्यक्तींव्यतिरिक्त अक्कलकोट राजघराण्याशी इतर कोणत्याही व्यक्ती/ इसम यांचा कुठल्याही प्रकारचा कसलाही संबंध नाही.

सबब, तमाम लोकांना या सूचनेद्वारे कळविण्यात येते की, अगर एखादी व्यक्ती/ इसम त्याचा अक्कलकोट राजघराण्याशी संबंध अथवा वारस असल्याचे सांगत/ भासवत असेल तर त्याच्यावर विश्वास ठेवू नये. तसेच त्यांनी केलेल्या अक्कलकोट राजघराण्याविषयी कुठल्याही वक्तव्याचा अवलंब करू नये. लोकांना फसवण्यासाठी अक्कलकोट राजघराण्याचा सदस्य/ वारस असल्याची केलेली बतावणी वर विश्वास ठेऊ नये व तशी बतावणी केल्यास अथवा आढळून आल्यास संबंधित व्यक्तीवर योग्य ती कायदेशीर कार्यवाही केली जाईल.

तसेच अगर कोणाला अक्कलकोट राजघराण्याची अधिक माहिती हवी असल्यास त्यांनी **http://royalfamilyakkalkot.com** या संकेतस्थळावर भेट द्यावी.

सबब, ही सावधगिरीची/ खबरदारीची सूचना

**अक्कलकोट**

दि. ०३/०६/२०२५

स्वाक्षरित/-

**ॲड. एस. जे. राजे भोसले, ॲड. प्रतिक अ. तावरे**

R/o. New Palace Premises, Akkalkot, Dist. Solapur

मोबा. ९४२३०३२३३२/९८५०९३७७७३

बंगला नं. ६२, कॅम्प, सदर बझार, सातारा ४१५००१

मो. ९४२३०३२३३२

## संपादकीय....

### बंदची हाक

देशातील १० केंद्रीय कामगार संघटनांनी भारत बंदची हाक दिलेली आहे. उद्या भारत बंदची घोषणा करण्यात आलेली आहे. कामगार आणि शेतकरी संघटना भारत बंदमध्ये सहभागी होणार आहेत. केंद्र सरकारची मजूर, कामगारविरोधी धोरणं, शेतकऱ्यांच्या विरोधातील आणि कॉर्पोरेट्सची तळी उचलणारी धोरणं याविरोधात ९ जुलैला भारत बंदची हाक देण्यात आलेली आहे. सरकारकडून आर्थिक आणि कामगार कायद्यांमध्ये सुधारणा करण्याच्या प्रयत्नात आहे. त्यामुळे मजुरांचं अधिकार आणखी मर्यादित होतील. व्यापार करण्याची प्रक्रिया सुलभ करण्याच्या नावाखाली सरकार सर्वसामान्यांना नाडत असल्याचा आरोप संघटनांचा आहे. उद्या होणाऱ्या बंदमध्ये देशभरातील २५ कोटी कामगारांचा सहभाग असेल. बँकिंग, खाणकाम, पोस्टल सर्व्हिस, बांधकाम यांच्यासह विविध क्षेत्रातील कामगार बंदमध्ये सहभागी होणार आहेत.

# आषाढी वारीचे यश हे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या नेटक्या नियोजनाचे फलित...

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

आषाढी वारी ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि अध्यात्मिक परंपरेचा एक अविभाज्य भाग असून, ती केवळ एक धार्मिक यात्रा नसून सामाजिक सलोखा, शिस्त आणि एकात्मतेचे मूर्त स्वरूप आहे. या महत्त्वपूर्ण वारीचे यशस्वी आयोजन हे केवळ श्रद्धाळूंच्या सहभागावर नाही, तर प्रशासनाच्या सुसूत्र आणि सजग नियोजनावरही अवलंबून असते. दिनांक ६ जुलै २०२५ रोजी पार पडलेल्या आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर, २६ जून ते १० जुलै २०२५ या कालावधीत झालेल्या वारीचे नियोजन हे सोलापूर जिल्हाधिकारी श्री. कुमार आशीर्वाद यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखालील काटेकोर नियोजन व धाडसी निर्णयामुळे ही वारी अधिक सुसंगत, सुरक्षित आणि शिस्तबद्ध होऊन यशस्वी झाली.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या नेतृत्वाखाली आषाढी वारी २०२४ ही यशस्वी झाली होती. या वारीत स्वच्छतेला अधिक प्राधान्य देऊन त्याचे काटेकोरपणे अंमलबजावणी झाल्याने वारकरी, भाविक यांना चांगल्या सुविधा मिळाल्या होत्या. परंतु मागील वर्षीच्या वारीच्या अनुभवावर पालखी, दिंडया, पालखी महामार्ग, वाखरी पालखी तळ, ६५ एकर व पंढरपूर शहर या ठिकाणी देण्यात येणाऱ्या सोयी सुविधांमध्ये सुधारणा करणे आवश्यक वाटल्याने जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी आषाढी वारी २०२५ मध्ये त्या अनुषंगाने नियोजनबद्ध निर्णय घेऊन त्या निर्णयाची प्रत्यक्ष अमलबजावणी केली व ती अंमलबजावणी व्यवस्थितपणे होत आहे की नाही याची खात्रीही स्वतः फिल्डवर जाऊन केली. यावेळी गर्दीच्या ठिकाणी जाताना भाविकांना त्रास होऊ नये यासाठी त्यांनी पायी जाणे, बाईकवर जाऊन देखरेख व नियंत्रण ठेवले. त्यामुळे वारकरी, भाविक यांना अधिक चांगल्या व वेळेत सुविधा देण्याची व्यवस्था अधिक तत्परतेने झाली.

*उजनी धरणातील पाण्याचे नियोजन –

यावर्षी पावसाचे प्रमाण खूप अधिक असल्याने तसेच उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर पाऊस पडत असल्याने उजनी धरणात उपयुक्त पानासाठी जवळपास ७३% झाला होता व भीमा नदीत पाणी सोडले जात होते. त्यामुळे पंढरपूर येथे चंद्रभागा नदीला पूर परिस्थिती निर्माण होऊन संपूर्ण वाळवंट पाण्याखाली गेलेले होते. तसेच नीरा नदीचे पाणी व उजनी धरणातील पाण्याचे योग्य नियोजन करून चंद्रभागा नदी पात्रात पाणी आवश्यक त्या प्रमाणातच राहील यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद स्वतः लक्ष घालून या पाण्याचे नियंत्रण व नियोजन करत होते. त्यासाठी जलसंपदा विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्कात राहून उजनी धरणातील सोडण्यात येणारे पाणी कमी करून यात्रा कालावधीत चंद्रभागा नदीचे वाळवंट भाविकांसाठी रिकामे राहील याची दक्षता त्यांनी घेतली.

*व्हीआयपी दर्शन बंद –

श्री विठ्ठल रुक्मिणीच्या पद दर्शनासाठी वारकरी सर्वसामान्य भाविक मोठ्या प्रमाणावर दर्शन रांगेत किमान १५- १६ तास उभे राहतात. तसेच व्हीआयपी दर्शनामुळे हा कालावधी अधिक वाढू शकतो याचा अनुभव मागील वारी कालावधीत आलेला होता. त्यामुळे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी व्हीआयपी दर्शन बंद करण्याचा खूप मोठा व धाडसी निर्णय सर्वसामान्य भाविकांसाठी घेतला. व्हीआयपी दर्शन बंद करण्याचा निर्णय घेणारे ते पहिलेच जिल्हाधिकारी ठरले. या निर्णयामुळे भाविकांमध्ये आनंदी वातावरण झाले तसेच पदस्पर्श दर्शनाचा कालावधी किमान

पाच ते सहा तासांनी कमीही झाला. त्यामुळे दर्शन रांगेत उभा राहणाऱ्या लाखो भाविकांना याचा फायदा झाला. या निर्णयाचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात आले. जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी हा निर्णय सर्वसामान्य वारकरी भाविक यांचे दर्शन लवकर व्हावे व त्यांना दर्शन रांगेत जास्त वेळ उभा राहावे लागू नये यासाठी कोणालाही न विचारता स्वतःच्या अधिकारात घेतला. मागील पन्नास वर्षापासून व्हीआयपी दर्शन बंद करण्याबाबतची फक्त चर्चा होत राहिली, परंतु जिल्हाधिकारी यांनी हा निर्णय घेऊन वारकऱ्यांचे व सर्वसामान्य भाविकांचे दर्शनाची वेळ खूप कमी केली, त्यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत असले तरी त्यांना या निर्णयाचा अप्रत्यक्षपणे त्रास ही झाला.

*नो व्हेईकल झोन –

अति महत्त्वाच्या व्यक्तींची वाहने थेट मंदिरापर्यंत येत होती. त्यामुळे सर्वसामान्य भाविक वारकऱ्यांना खूप त्रास होत होता. तसेच चौपाळ ते मंदिर या रस्त्यावर खूप मोठ्या प्रमाणात गर्दी असल्याने अनुचित घटना घड नेची शक्यताही नाकारता येत नव्हती. त्यामुळे चौपाळ ते मंदिर हा रस्ता नो व्हेइकल झोन करण्याचे आदेश जिल्हाधिकारी

कुमार आशीर्वाद यांनी काढले. त्यामुळे मंदिर प्रदक्षिणा तसेच दर्शन घेऊन बाहेर पडणाऱ्या भाविकांना याचा फायदा झाला तसेच पोलीस प्रशासनावरील ताण ही कमी झाला. या निर्णयाचे वारकरी संप्रदाय व सर्व सामान्य नागरिकांनी कौतुक केले. परंतु याही धाडसी निर्णया बाबत त्यांना त्रास झाला.

*नामदेव पायरी ते चौपाळ रस्ता भाविकांसाठी वन वे :-

आषाढी वारीत नामदेव पायरी तसेच श्री विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी मंदिर परिसरात खूप मोठी गर्दी भाविक करतात. चौपाळ ते मंदिर पर्यंत नवे कल झोन केले तरी मंदिर प्रदक्षिणा करणाऱ्या भाविकांची संख्या खूप मोठी असते. मंदिरातून दर्शन घेऊन जाणारे भाविक ही बाहेर पडतात. त्यामुळे येथे वारकऱ्यांची भाविकांची लाखोंची संख्या असते. त्यामुळे या ठिकाणी चेंगरा चेंगरी होण्याचीही शक्यता असते. त्यामुळे नामदेव पायरी ते चौपाळ हा रस्ता पायी चालत जाणाऱ्या भाविकांसाठीही वनवे करण्यात आला. त्यामुळे पोलीस विभागाला गर्दीवर योग्य नियंत्रण ठेवणे शक्य झाले व यातून कोणत्याही प्रकारची अनुचित घटना होण्यापासून प्रशासनाला यश मिळाले.

*आषाढी साठी भाविकांचे गर्दीचे रेकॉर्ड –

आषाढी वारी २०२५ मध्ये प्रशासनाने अनुमान लावल्याप्रमाणे २० ते २२ लाख पंढरपूर मध्ये दाखल झालेले होते. कारण यावर्षी पाऊस वेळेपूर्वी झालेला होता व शेतकरी वर्गांच्या बहुतांश पेरण्या ही पूर्ण झालेल्या होत्या त्यामुळे वारीला मोठी गर्दी होईल याची अपेक्षा प्रशासनाने केलेली होती व त्यानुसारच नियोजन ही केलेले होते. विठ्ठल रुक्मिणीच्या पददर्शनाची रांग गोपाळपुराच्या पुढे गेलेली होती. ही रांग आणखी खूप पुढे जाण्याची शक्यता होती. एक तर पंढरपूर मध्ये आलेल्या भाविकांना दर्शन रांगेत पोहोचण्यासाठी सात आठ किलोमीटर प्रवास करावा लागत होता. त्यामुळे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी पुढाकार घेऊन गोपाळपूरच्या जवळ हॉटेल आसरा समोर एक जर्मन हंगर टेन्ट व तिथून सातशे मीटर अंतरावर एका शेतकऱ्याच्या शेतात दुसरा जर्मन हंगर टेन्ट रातोरात उभा करून घेतला. पहिल्या टेन्ट मध्ये दीड किलोमीटरची रांग तर दुसऱ्या टेन्ट मध्ये अडीच किलोमीटरची दर्शन रांग अड्जस्ट करण्यात आली. तसेच दर्शन रांगेत देण्यात येणाऱ्या सर्व सोयी सुविधा त्यांच्या बाहेर एकाच ठिकाणी उपलब्ध झाल्या तसेच पोलिसांनाही या ठिकाणी नियंत्रण ठेवणे शक्य झाले. व भाविकांनाही याचा खूप मोठा लाभ झाला. जवळपास चार किलोमीटरच्या दर्शन रांगेचे टेंटच्या माध्यमातून व्यवस्थापन करण्यात जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

*पंढरपूर शहरातील अतिक्रमणे काढली –

आषाढी वारी २०२५ च्या अनुषंगाने पंढरपूर शहरात श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी वीस लाखापेक्षा अधिक भाविक येण्याची शक्यता प्रशासनाने गृहीत धरली होती त्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी पंढरपूर शहरातील सर्व रस्त्यावरील अतिक्रमणे काढण्याबाबत उपविभागीय अधिकारी उपविभागीय पोलीस अधिकारी व पंढरपूर नगरपरिषद यांना निर्देश देणे दिले होते त्या अनुषंगाने शहरातील सर्व अतिक्रमणे काढून रस्ते मोकळे व प्रशस्त करण्यात आले होते त्यामुळे भाविकांना अतिक्रमणाचा कोणताही त्रास होणार नाही व गर्दीवर नियंत्रणासाठी ही हा निर्णय महत्वपूर्ण ठरला. तसेच पालखी मार्ग पालखीतळ या ठिकाणी झालेली ही अतिक्रमणे काढून टाकण्यात आली तसेच पंढरपूर शहर व पालखी मार्गावर अवैध होर्डिंग काढून घेण्यात आले. तसेच असे होर्डिंग्स पुन्हा कोणी उभे केल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

*पालखी तळ सुविधा –

श्री संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज व जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या पालख्या मार्गावरील पालखी तळ तसेच विसावा ठिकाणी पावसामुळे चिखल होऊ नये यासाठी मागील वर्षीच्या अडीच पट मुरमीकरण करण्यात आले. तसेच तळा वरून शौचालयास जाण्यासाठी ही रस्त्यावर मुरमीकरण करण्यात आले. तसेच पालखीतळावर ९४ वॉटरप्रूफ तर ११ जर्मन हँगर मंडप उभारण्यात आले. यातून ७ लाख ८५ हजार चौरस फूट जागा उपलब्ध झाली जी मागील वर्षी तीन लाख १२ हजार चौरस फुटाचे वॉटरप्रूफ मंडप टाकण्यात आलेले होते, मागील वर्षीच्या अडीच पट जास्त वॉटरप्रूफ मंडप टाकण्यात आलेले होते. संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज पालखी सोबत पाच मोबाईल चार्जिंग व्हॅन देण्यात आलेल्या होत्या. तसेच पालखी मार्गावर विष ठिकाणी बीएसएनएलच्या मदतीने टेलिफोन स्टॅन्ड उभारण्यात आले होते याद्वारे वारकरी आपल्या नातेवाईकाच्या संपर्कात राहू शकत होते.

स्वच्छता –

मागील वर्षी प्रमाणे याही वर्षी आषाढी वारीत स्वच्छतेला खूप मोठे प्राधान्य देण्यात आलेले होते. मागील वर्षीचा अनुभव लक्षात घेऊन यावर्षी डव्हान्स मोबाईल टॉयलेट सिस्टीम उभी केलेली होती. श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखी साठी ३६०० मोबाईल टॉयलेट तर जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या पालखीसाठी २४०० मोबाईल टॉयलेट पुरवठा करण्यात आला होता. हे सर्व टॉयलेट सातारा जिल्ह्यातून सोलापूर जिल्ह्याच्या हद्दीत व सर्व पालखीतळावर पोहोचवण्यासाठी मोबाईल टॉयलेट सिस्टीम चा वापर करण्यात आला. यासाठी एका उपजिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्याची नियुक्ती करून त्याच्या अधिनस्त अधिकारी कर्मचारी वर्ग उपलब्ध करून देण्यात आला होता. पालखी तळावर मुक्कामाला येण्यापूर्वीच मोबाईल टॉयलेटची व्यवस्था तसेच त्यासाठी आवश्यक असलेला पाणीपुरवठा व सफाई कर्मचारी यांची उपलब्धता केली जात होती, त्यामुळे कोठेही अस्वच्छता निर्माण झालेली नाही.

पालखी मार्ग, पंढरपूर शहर, वाखरी तळ तसेच ६५ एकर या भागात मोबाईल टॉयलेट वारकऱ्यांसाठी मोठ्या प्रमाणात उपलब्ध करून देण्यात आलेले होते. या टॉयलेटची वेळोवेळी स्वच्छता करण्यासाठी सफाई कर्मचारी, पाण्याची व्यवस्था उपलब्ध केलेली होती. तसेच वारी कालावधीत पालखी मार्ग पंढरपूर शहरात



कोणत्याही प्रकारची अस्वच्छता निर्माण होऊ नये यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी स्वतः पुढाकार घेऊन सफाई कर्मचाऱ्यांचे सुपरवायझर, नगरपालिकेचे मुख्याधिकारी व पंचायत समितीचे बिडीओ त्यांच्या तीन ते चार बैठका घेतल्या. यात त्यांना त्या त्या भागातील शौचालयाचे नियंत्रण अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले. या माध्यमातून सुपरवायझर वर खूप मोठे नियंत्रण निर्माण करून त्याच्या मार्फत सफाई कर्मचाऱ्याकडून टॉयलेटची स्वच्छता राबवली गेली. जर कोठेही अस्वच्छता राहिली तर संबंधित भागाचे सुपरवायझरवर कठोर कारवाई करण्याचे निर्देशही देण्यात आलेले होते. त्यामुळे सुपरवायझर यांनी संबंधित सफाई कर्मचारी यांच्याकडून टॉयलेटची स्वच्छता उत्तम प्रकारे करून घेतली. व संपूर्ण पंढरपूर शहर तसेच पालखी मार्गावर खूप चांगली स्वच्छता राहिली, यात जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी केलेले सूक्ष्म नियोजन खूप महत्वपूर्ण ठरले.

* सक्शन व जेटिंग मशीन साठी कॉरिडॉर –

पंढरपूर शहर तसेच पालखी मार्गावर मोबाईल टॉयलेट मधील मैला काढून घेऊन दुसरीकडे डम्प करण्यासाठी सक्शन व जेटिंग मशीन वारकऱ्यांच्या गर्दीतून बाहेर काढण्यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी तसेच पंढरपूर नगरपरिषद त्यांच्याशी समन्वय ठेवून कॉरिडॉर तयार करण्यात आला. त्यामुळे ही वाहने गर्दीतून बाहेर काढणे व त्याभागाची स्वच्छता राखणे प्रशासनाला शक्य झाले. तसेच जिल्हाधिकारी आशीर्वाद त्यांनी स्वतः पुढाकार घेऊन शौचालयाची व्यवस्था केलेल्या प्रत्येक ठिकाणी दिनांक ३, ४, ५ व ६ जुलै रोजी स्वच्छतेची पाहणी केली. तसेच ज्या ठिकाणी अस्वच्छता राहिली आहे त्या ठिकाणच्या कर्मचाऱ्यांना त्याबाबतचे निर्देश दिले त्यातून स्वच्छतेच्या अनुषंगाने खूप मोठा संदेश सर्व ठिकाणच्या सफाई कर्मचाऱ्यांमध्ये गेला.

जिल्हाधिकारी महोदयांनी गर्दीची परिस्थिती पाहता काही ठिकाणी पायी जाऊन तर काही ठिकाणी बाईकवर जाऊन पाहणी केली.

आरोग्य सुविधा –

वारकऱ्यांना आरोग्याच्या चांगल्या सुविधा मिळाव्यात यासाठी पालखी मार्ग पालखी स्थळ असे फिल्डवर २५ खउण कक्ष स्थापन करण्यात आले. सोलापूर जिल्ह्याच्या बाहेरून १०० स्पेशालिस्ट डॉक्टरची सेवा वारीसाठी घेण्यात आली. यामध्ये बालरोग, स्त्रीरोग व अस्थिरोग तज्ञ विविध आजारावरील तज्ञांचा समावेश होता. आरोग्याच्या सुविधा निर्माण करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीमध्ये ३ कोटी ५० लाखाचा निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. वारकऱ्यांच्या सेवेसाठी १२१ म्बुलन्स बाईक तसेच पालखी मार्ग पालखीत या ठिकाणी १४३ किरकोळ आजारावर उपचारासाठी आरोग्य सेवा कक्ष निर्माण केलेले होते. तसेच पालख्यांसाठी ४५०० मेडीकल किट वाटप करण्यात आलेले होते.

*आपत्ती व्यवस्थापन –

वारी कालावधी गर्दीचे योग्य नियंत्रण होणे आवश्यक होते त्या अनुषंगाने १३ हॉटस्पॉट शोधण्यात आले व प्रत्येक हॉटस्पॉट वर पोलिसांचे पथक तैनात करण्यात आले तसेच पोलीस टीम सोबत या ठिकाणी एक खउण पक्ष निर्माण करण्यात आला. या स्पॉटवर कोणतीही अनुचित घटना होऊ नये यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद त्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यवाही केली जात होती.

*एकात्मिक नियंत्रण कक्ष –

पंढरपूर शहर पोलीस स्टेशनच्या जवळ वारी कालावधीत सर्व शासकीय विभाग प्रमुखांसाठी इंटिग्रेटेड कंट्रोल रूम निर्माण केलेली होती. या अंतर्गत तुझी सेवा असलेले १०० नोकिया फोन संबंधित कार्यालय प्रमुखांना देऊन वारी कालावधी परस्पर संवाद व समन्वय यासाठी याचा वापर करण्यात आला, त्यातून सर्व संबंधित विभागात समन्वय चांगला होऊन वारकऱ्यांना अधिक तत्परतेने सेवा देणे सुलभ झाले. या ठिकाणी २८० सीसीटीव्ही च्या माध्यमातून संपूर्ण पंढरपूर शहरातील फीड मिळत होते. त्यामुळे अत्यंत गतीने निर्णय घेणे शक्य झाले व यातून कोणताही अनुचित प्रकार घडून येण्यासाठी करडी नजर ठेवली जात होती. प्रशासनातील अधिकारी कर्मचाऱ्यांसाठी ५० ठिकाणी मोफत वायफाय ची सुविधा उपलब्ध केली होती.

*होडी चालक नोंदणी अनिवार्य –

चंद्रभागा नदी जल प्रवासी वाहतूक करणाऱ्या प्रत्येक होळीचालकाची नोंदणी करणे अनिवार्य करण्यात आले होते. यासाठी जिल्हाधिकारी आशीर्वाद, पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी संबंधित होडी चालक यांच्या समवेत किमान तीन ते चार बैठका घेऊन त्यांना विविध मार्गदर्शक सूचना दिल्या होत्या. १९० होडीची नोंद प्रशासनाकडे झाली, त्या सर्व होडी चालकांनी सर्व होडी व्यवस्थित असल्याचे प्रमाणपत्र देणे बंधनकारक होते. प्रत्येक होडी मध्ये वीस पॅसेंजर प्लस दोन होडी चलक असे २२ व्यक्तींनाच जलप्रवास करणे अनिवार्य करण्यात आलेले होते.

जलप्रवास करताना प्रत्येक होडीवर लाईफ जॅकेट आणि वारे होते जिल्हा प्रशासनाच्या वतीने १००० लाईफ जॅकेट होडीच्या लोकांना पुरवण्यात आलेले होते. तसेच चंद्रभागा नदीपात्रात सहा ठिकाणी जेटी पॉइंट तयार केले होते या प्रत्येक पॉईंट मधूनच जल वाहतूक करण्याचे बंधन होडीच्या लोकांना घालण्यात आलेले होते. त्यामुळे पोलीस विभागामार्फत जल प्रवासी वाहतूक व होडी चालक यांच्यावर योग्य नियंत्रण ठेवणे खूप सुलभ झाले. यासाठी १६ पोलीस कर्मचारी नियुक्त केलेले होते. तसेच प्रशासनाच्या वतीने मागील वर्षीच्या नऊ लाईफ बोटी मध्ये वाढ करून एकूण २२ लाईट होती चंद्रभागा नदीपात्रात ठेवण्यात आलेल्या होत्या यावर २६४ पट्टीचे पोहणारे व प्रशिक्षित व्यक्तींची नोंदणी नियुक्ती करण्यात आलेली होती यामध्ये एनडीआरएफचे जवान तसेच कोल्हापुर येथील ७५ पोहणारे युवक तर पंढरपूर शहरातील कोळी समाजाचे पट्टीचे पाहणारे ५० युवक मानधनावर कार्यरत होते. मागील एका आठवड्यात नदीच्या पाण्यात बुडणाऱ्या २३ व्यक्तींचा बचाव या पथकाकडून करण्यात आलेला होता. या २३ व्यक्तींना मिळालेले जीवनदान हे जिल्हा प्रशासनाने केलेल्या काटेकोर नियोजनाचे फलित होते.

*गॅस सिलेंडरचा पुरवठा –

सोलापूर जिल्ह्याचे हद्दीत पालखी मार्गावर मुक्कामाचे ठिकाणी वाखरी पालखीचे तसेच ६५ एकर या भागात थांबणाऱ्या वारकऱ्यांसाठी प्रशासनाच्या वतीने गॅस सिलेंडरचा पुरवठा करण्यात आला यासाठी सर्व संबंधित गॅस एजन्सीची बैठक घेऊन त्यांना मार्गदर्शक सूचना दिलेल्या होत्या तसेच प्रत्येक गॅस बिल्डरवर ग्रीन स्टिकर अनिवार्य करण्यात आलेले होते सर्व सिलेंडर वापरण्यास योग्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र ही संबंधित गॅस एजन्सी करून घेण्यात आलेले होते. त्यामुळे गॅस लिकेज होऊन कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये यासाठी प्रशासनाने योग्य ती खबरदारी घेतलेली होती.

*वाखरी पालखी तळ –

पंढरपूर शहरापासून जवळ असलेला वाखरी पालखीतळ हा सर्व मानांच्या पालखीसाठी महत्त्वाचा तळ आहे या ठिकाणी बोटं सर्व मानाच्या पालख्या मुक्कामी असतात. त्यामुळे या पालखी तलावर सर्व प्रकारच्या सोयी सुविधा चांगल्या असावेत यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी स्वतः लक्ष घालून सुविधांची खात्री केलेली होती. या पालखीतळावर अंतर्गत रस्ते यासाठी एक कोटीचा निधी वापरण्यात आलेला होता. पाऊस आला तर या ठिकाणी चिखल होणार नाही या दृष्टीने सर्व तयारी पूर्ण केलेली होती तसेच आवश्यक तेवढे मोबाईल टॉयलेट उपलब्ध केलेले होते या ठिकाणी स्वच्छता राहील यासाठी पुरेसे मनुष्यबळ तसेच पाणीपुरवठा व्यवस्था केलेली होती.

*महिलांसाठी विशेष सुविधा –

सर्व पालखी मार्ग, पालखी तळ, वाळवंट, वाखरी तसेच ६५ एकर व पंढरपूर शहरात महिलांसाठी विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेले होत्या. महिलांसाठी स्वतंत्र २२५० स्नानगृहे उपलब्ध केलेली होती. जिल्ह्यात १५५ अहिल्यादेवी होळकर हिरकणी कक्ष निर्माण केली होते. या अंतर्गत स्तनदामाता साठी विशेष सुविधा उपलब्ध केली होती. त्याच ठिकाणी महिलांसाठी मोफत सॅनिटरी पॅड ची व्यवस्था करून प्रत्येक हिरकणी कक्षामध्ये आरोग्य सेविका यांची नियुक्ती केलेले होते. या प्रकारे जिल्हा प्रशासनाने संपूर्ण वारी कालावधीत महिलांना विशेष सुविधा उपलब्ध करून दिल्या होत्या.

*पाणी पुरवठा –

वारी कालावधीत संपूर्ण पालखी मार्ग पालखी तळ पालखीचे मुक्काम ठिकाणी पिण्याचे पाणी व सांडपाणी पुरवठा नियोजन प्रशासनाने अत्यंत चोखपणे केलेले होते त्यामुळे कोठेही कोणत्याही प्रकारची अस्वच्छता निर्माण झालेली नाही. पिण्याच्या पाण्याचे ८५२ स्त्रोत ठरवून १३४ ठिकाणी टँकर फीडिंग पॉईंट निर्माण केलेले होते. वारी सुरू होण्यापूर्वी एक ते दीड महिना अगोदरपासूनच पाणी फीडिंग पॉईंट मधील पाणी स्त्रोताची तीन ते चार वेळा टेस्ट घेण्यात आली. पाण्याच्या शुद्धीकरणाला व क्लोरिनेशन ला खूप महत्त्व देण्यात आले. प्रत्येक वारकऱ्याला स्वच्छ पाणीपुरवठा जिल्हा प्रशासनाच्या यशस्वी नियोजनातून करण्यात आला.

*वाखरी ते पंढरपूर महामार्गाची दुरुस्ती –

वाखरी ते पंढरपूर या पाच किलोमीटर रस्त्याचे काम अपूर्ण होते. या महामार्गाच्या दुरुस्तीसाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक उपविभागीय पोलीस अधिकारी तसेच राष्ट्रीय महामार्गाचे अधिकारी यांच्या समवेत चार ते पाच वेळा पाहणी केली त्यातून ३५ पॅच शोधण्यात आले. या सर्व पॅच ची दुरुस्ती करणे, मुरमीकरण करणे, स्लोप देण्याचे काम करणे आदी कामावर स्वतः जिल्हाधिकारी यांनी लक्ष ठेवून ही कामे संबंधित यंत्रणांकडून करून घेतली. या पूर्ण कामामुळे वारी कालावधीत वारकरी, भाविक यांना कोणताही त्रास होणार नाही तसेच या मार्गावर अपघात होणार नाही या दृष्टीने प्रशासनाने पॅचवर्क उत्कृष्टपणे केले.

*पंढरपूर शहर तसेच वाखरी तळ व ६५ एकर येथे सजावट –

यावर्षी पंढरपूर शहरात एक वेगळ्या वैशिष्ट्यपूर्ण प्रकारच्या सहाशे पन्नास लाईटचे पोल लावून शहरात रात्रीच्या वेळी प्रकाशयोजना केलेली होती. यासाठी पंढरपूर नगरपरिषदेला नियोजन समितीतून एक कोटी पंचा हत्तर लाखाचा निधी उपलब्ध केलेला होता. तसेच पालखी मार्ग व पालखी तळावर वारकरी भाविकांच्या व पालकांच्या स्वागतासाठी मोठमोठे आकर्षक कमानी केलेल्या होत्या. पंढरपूर शहरात येणाऱ्या वारकरी व भाविकांना दिशादर्शक

चिन्ह व नकाशाच्या माध्यमातून माहिती मिळावी यासाठी आवश्यक त्या उंचीवर व मोठ्या आकारात माहिती देण्यात आलेली होती. तसेच पंढरपूर शहरात आलेल्या वारकरी व भाविकांना भजन व कीर्तन करता यावी यासाठी १५० ठिकाणी लाऊड्स स्पीकरची व्यवस्था केलेली होती. वापी पालखी तळावर खूप मोठ्या प्रमाणावर वृक्ष आहेत या वृक्षावरही तसेच तळावर व ६५ एकर येथे खूप आकर्षक अशी विद्युत प्रकाश व्यवस्था केलेली होती त्यामुळे संपूर्ण पंढरपूर शहर एक आकर्षक विद्युत प्रकाश योजनेने उजळून निघालेले होते.

*मटन चिकन विकण्यास प्रतिबंध –

पंढरपूर शहरात दिनांक ३० जून २०२५ ते १२ जुलै २०२५ या कालावधीत मटण चिकन विकण्यास प्रतिबंध घालण्यात आलेला होता. यासाठी जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी मनाई आदेश दिलेले होते. तसेच पालखी मार्गावर पालखी मुक्कामी असलेल्या गावांमध्येही मटन चिकन विक्री बंदी होती. त्याप्रमाणेच दारूबंदीचे आदेशही दिलेले होते. पंढरपूर शहरात दिनांक पाच ते दहा जुलै २०२५ या कालावधीत दारूबंदी आदेश तर पालखी मार्गावर पालखीच्या मुक्कामाच्या दिवशी दारूबंदी करण्यात आलेली होती. हे आदेश भंग करणाऱ्या विरोधात कठोर कारवाई करण्याबाबतचे निर्देशही देण्यात आलेले होते.

आषाढी वारी २०२५ यशस्वी करण्यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सर्व संबंधित शासकीय विभाग प्रमुख यांच्याशी चांगला समन्वय ठेवला. यासाठी मागील दोन महिन्यापासून जिल्हाधिकारी यांनी ५३ बैठका घेतल्या. वारी कालावधीत विविध प्रतिबंधात्मक आदेश काढले. वारकऱ्यांच्या सोयीसाठी अनेक चांगले आदेश काढले, तसेच असे आदेश काढून जिल्हाधिकारी थांबले नाहीत तर या आदेशाची अमलबजावणी संबंधित यंत्रणा कडून योग्य पद्धतीने होत आहे की नाही याची खात्री स्वतः जाऊन केली. वारकऱ्यांसाठी वाळवंट रिकामे राहावे यासाठी उजनीतून सोडण्यात येणाऱ्या पाण्याचे नियोजन ते २० जून पासून करत होते. म्हणून यात्रा कालावधीत भीमा नदी पात्रात मर्यादित पाणी प्रवाह ठेवून वाळवंटाचा वापर वारकऱ्यांसाठी करता आला. पालखी मार्ग, पालखी तळ, पंढरपूर शहरातील स्वच्छता, सर्व सोयी सुविधा याची खात्री जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद स्वतः करत असल्याने प्रत्येक कामात एक सुसूत्रता राहिली.

उपरोक्त सर्व बाबीच्या अनुषंगाने या वर्षीच्या आषाढी वारीत, सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या नेतृत्वाखाली प्रशासनाने उत्कृष्ट नियोजन केले. ६ जुलै २०२५ रोजी आषाढी एकादशी झाली. विविध विभागांमध्ये समन्वय साधून, आरोग्य पाणीपुरवठा, आपत्ती व्यवस्थापन, गर्दीवर नियंत्रण, वैद्यकीय सुविधा, स्वच्छता, आणि वाहतूक, भाविकांना सुलभ दर्शन व्यवस्था यांसारख्या क्षेत्रांमध्ये सुधारणा करण्यात आली. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद हे कागदावरच निर्णय व आदेश काढून थांबले नाहीत तर त्या आदेशाची व निर्णयाची प्रत्यक्ष अमलबजावणी केली. ज्यामुळे यंदाची आषाढी वारी ही जिल्हाधिकारी आशीर्वाद यांच्या शिस्तबद्ध आणि लोकाभिमुख व्यवस्थापनाचा एक उत्कृष्ट नमुना ठरली आहे.

**– सुनील सोनटक्के**
**जिल्हा माहिती अधिकारी, सोलापूर**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



# सोलापूर दूध संघातील गैरव्यवहार प्रकरणावर विधानसभेत आमदार अभिजीत पाटील यांनी उठवला आवाज

## राज्य दूध महासंघात अपहार करणाऱ्या अधिकाऱ्यांवर अद्याप कारवाई का नाही?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सोलापूर जिल्हा दूध उत्पादक संघामध्ये झालेल्या आर्थिक अपहार प्रकरणावर आज विधानसभेत आमदार अभिजीत पाटील यांनी शासनाची स्पष्ट भूमिका आणि जबाबदारी निश्चित करण्याची मागणी करत ठोस प्रश्न उपस्थित केला.

राज्य दूध महासंघात अपहार करणाऱ्या अधिकाऱ्यांवर अद्याप कारवाई का नाही? या प्रश्नाला जोडून आमदार पाटील यांनी सांगितले की, सोलापूर जिल्हा दूध संघातसुद्धा अशाच स्वरूपाचा प्रकार घडला होता. त्यावर ८३ आणि ८८ अंतर्गत चौकशीही झाली, संचालक मंडळ बरखास्त करण्यात आले. परंतु, मंत्रालयात पोहोचल्यानंतर एका वरिष्ठ अधिकाऱ्याने ही चौकशी रद्द करत संचालक मंडळ पुन्हा पूर्ववत केले.

हा सर्व प्रकार म्हणजे स्पष्टपणे भ्रष्टाचार सिद्ध झाल्यावरही शासन त्यावर कठोर पावले न उचलता दोषींना अभय देत असल्याचा स्पष्ट संदेश समाजात जात आहे, हे अत्यंत दुर्दैवी आहे, असे आमदार पाटील यांनी ठामपणे विधानसभेत सांगितले.

दोषींना निलंबित का करण्यात आले नाही? मंत्रालयातूनच चौकशी का रद्द करण्यात आली? भ्रष्टाचार सिद्ध झाल्यानंतरही संचालक मंडळ पूर्ववत का केले? अशा प्रकारांना अभय देण्याचा शासनाचा हेतू काय?

दूध उत्पादक शेतकरी आणि जनतेच्या पैशांचा अपहार करणाऱ्यांना अभय देणं म्हणजे अन्यायाला पाठबळ देणं होय. याविरोधात आम्ही आवाज उठवत राहू, आणि दोषींवर कठोर कारवाई करण्याबाबत ठोस भूमिका घेण्यात येईल, असा इशाराही आमदार अभिजीत पाटील यांनी यावेळी दिला.



## ग्रामपंचायत सरपंच पद आरक्षण सोडतीस ग्रामस्थांनी उपस्थित राहावे तहसीलदार : हेमंत ढोकले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




कळंब/ प्रतिनिधि, कळंब तालुक्यातील एकूण ९२ ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी २०२५ ते २०३० या कालावधीतील सरपंच पदाचे आरक्षण सोडत पद्धतीने निश्चित करण्यात आले आहे. यासाठीचा कार्यक्रम उपविभागीय अधिकारी कळंब यांच्या अध्यक्षतेखाली पंचायत समिती सभागृह येथे दि.१० जुलै २०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता आयोजित करण्यात आला आहे.

या आरक्षण सोडत कार्यक्रमात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ईतर मागासवर्गीय, विशेष मागासवर्गीय, व महिला अशा विविध प्रवर्गातील सरपंच पदासाठी आरक्षण निश्चित केले जाणार आहे हा कार्यक्रम पारदर्शक पद्धतीने राबविण्यात येणार असून संबंधित ग्राम पंचायतीच्या ग्रामस्थानी यामध्ये उपस्थित राहून माहिती मिळवावी. असे आव्हान कळंब चे तहसीलदार हेमंत ढोकले यांनी केले आहे.

आरक्षण सोडती दरम्यान उपस्थित ग्रामस्थांनी शिस्त व नियमांचे पालन करून कार्यक्रमाला सहकार्य करावे असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.




# नूतनीकृत वाडिया चॅरिटेबल हॉस्पिटलचा गुरुपौर्णिमेच्या शुभदिनी शुभारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : १० जुलै २०२५ रोजी गुरुपौर्णिमेच्या शुभदिनी रेल्वे लाईन्स भागातील नूतनीकृत वाडिया चॅरिटेबल हॉस्पिटल येथील ओपीडी विभाग, वातानुकूलीत औषधालय, २० खाटांचे वॉर्डस, पॅथॉलॉजी लॅब, सी टी स्कॅन आणि कॅन्टीन असे विविध विभाग सुरू करीत असल्याची माहिती संस्थेचे मानद सचिव शिरीष गोडबोले यांनी पत्रकार परिषदेत दिली.

ओपीडीची इमारत अद्यावत व देखणी झाली असून त्यात मेडिसीन ,सर्जरी, प्रसूती व स्त्री रोग, हृदयरोग, दंतचिकित्सा , नेत्रचिकित्सा , त्वचा रोग , मेंदू विकार यासाठीच्या विविध तज्ञ डॉक्टरांच्या वातानुकूलित कन्सल्टिंग रूम्स आहेत. या इमारतीचे उद्घाटन बालाजी अमाईन्सचे चेअरमन श्री, ए. प्रताप रेड्डी यांच्या शुभहस्ते करण्यात येईल.

ओपीडीच्या समोरच्या बाजूला वातानुकूलित औषधालय असून योग्य दरात औषधे उपलब्ध होतील. या औषधालयाचे उद्घाटन श्री. रंगनाथजी बंग यांच्या शुभ हस्ते तर २० खाटांच्या इनडोअर युनिटचे उद्घाटन शिक्षण प्रसारक मंडळी पुणे चे व्यवस्थापन समिती सदस्य सीए राजेश पटवर्धन यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

ह्याप्रसंगी स्व. डॉ. शिरीष वळसंगकर यांच्या प्रेरणेतून साकार झालेल्या सीटी स्कॅन विभागाचे उद्घाटन त्यांच्या पत्नी डॉ. उमा वळसंगकर यांच्या हस्ते , पॅथॅलॉजी विभागाचे उद्घाटन डॉ . राजीव वैशंपायन व वैशंपायन कुटुंबियांच्या शुभहस्ते होणार आहे. हॉस्पिटल मध्ये येणाऱ्या रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांची सोयी करिता उपहारगृहाचे उद्घाटन हॉस्पिटलच्या आधीच्या निवृत्त कर्मचाऱ्यांच्या हस्ते करण्यात येईल.

या हॉस्पिटल साठी काही ज्येष्ठ अनुभवी प्रतिथयश तज्ञ डॉक्टर्स, गरजू रुग्णांसाठी, दर बुधवारी ९ ते १ यावेळेत विनामूल्य तपासणी करणार आहेत. ही सेवा अमूल्य सेवा योजना अशी असेल. त्याच प्रमाणे स्वयंसेवी ज्येष्ठ नागरिक रोज आपला वेळ रुग्णांच्या मदतीसाठी देणार असून या अभिनव योजनेला सेवाव्रती योजना असे म्हटले आहे. अशा प्रकारची विशेष सेवा देणारी ही सोलापुरातील पहिलीच संस्था असल्याचे हॉस्पिटलचे वैद्यकीय अधिक्षक डॉ . ज्ञानेश्वर सोडल ह्यांनी सांगितले.

लवकरच एन् टी पी सी च्या माध्यमातून आकारात येणाऱ्या इमारतीमध्ये १०० खाटांचे अद्ययावत विभाग व भविष्यामध्ये २५० असे एकूण ३५० खाटांचे भव्य रुग्णालय आणि मेडिकल कॉलेज सुरु करण्याचा संकल्पित मानस आहे असे डॉ सुनील घाटे म्हणाले.

रुग्णालयाच्या उभारणीबरोबरच शि. प्र. मंडळी , पुणे आणि वाडिया हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने जी-एनएम नर्सिंग स्कुलची सुरुवात होणार आहे.

हॉस्पिटलच्या या कार्यामध्ये अनेक संस्थांपैकी एनटीपीसी , बालाजी अमाईन्स ग्रुप , शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे , बंग डाटा फॉर्म्स, इंडोकाउन्ट लि., अल्ट्राटेक कंपनी आणि यासह इतर व्यक्ती आणि प्रतिष्ठान यांच्या आर्थिक योगदानाचा समावेश आहे. निधी उभारणी कार्याची सुरुवात हॉस्पिटलच्या विद्यमान गव्हर्निंग कौन्सिल सदस्यांनी वैयक्तीक सहभागाने केली आहे हे विशेष होय.

इतिहास

एन. एम. वाडिया चॅरिटेबल हॉस्पिटल हे १९३४ मध्ये सुरू झालं आणि १९४९ मध्ये याचा ट्रस्ट होऊन अधिकृत घटना तयार झाली. सुरुवातीला वाडिया कुटुंबीयांनी दिलेल्या देणगीतून इमारत बांधून झाली आणि त्यामुळे या ट्रस्टला एन. एम. वाडिया चॅरिटेबल ट्रस्ट असं नाव देण्यात आलं. हॉस्पिटल चे पहिले अध्यक्ष कै . डॉ. विष्णु गणेश वैशंपायन यांच्या अथक परिश्रमातून मेडिकल कॉलेज ची उभारणी झाली आणि मरणोत्तर त्यांचे नांव कॉलेजला देण्यात आले. आणि १९७४ साली ते कॉलेज महाराष्ट्र शासनास हस्तांतरित करण्यात आलं, तरीही हे हॉस्पिटल या वैद्यकीय महाविद्यालयला संलग्न होतं.

या हॉस्पिटलचा इतिहास पाहिला तर १९३२ मध्ये डॉक्टर वैशंपायन हे बॉम्बे लजिस्लेटिव कौन्सिलचे मेंबर होते. त्यांनी त्यांच्या सहकाऱ्यांबरोबर चर्चा करून, मिळून सोलापूर मध्ये हॉस्पिटल चालू करायचे ठरवले. सुरुवातीला दाट वस्ती असलेल्या परिसरात त्यांनी दवाखाना चालू केला . या दवाखान्या मध्ये इतके रुग्ण येत की त्यांना हॉस्पिटल असावं अशी गरज भासू लागली आणि म्हणून सुरुवातीला चौदाशे रुपये इमारत निधी गोळा करून हॉस्पिटल सुरू करायचे निश्चित झाले.

ही संस्था सुरवातीपासूनच अतिशय निस्वार्थ आणि तन मन धनाने काम करणारी अश्या व्यक्तींमुळे आहे. डॉ. वैशंपायन यांच्या प्रयत्नाने १९३३ मध्ये हॉस्पिटलची कोनशीला बसवण्यात आली आणि १९३४ मध्ये १४ ऑगस्टला २४ बेड्स चं हॉस्पिटल तयार झालं. पण प्रत्यक्ष काम मात्र १४ ऑक्टोबर १९३४ ला सुरू झालं. कै . हिराचंद नेमचंद दोशी, किसनलाल गुलाबचंद देवडा, मेघराज गुलेच्छा, सोलापूर नगरपालिका , केंद्रीय आरोग्य विभाग आणि अशाच अनेक दानशूर देणगीदारांच्या प्रयत्नातून या हॉस्पिटलची वाढ झाली. हे हॉस्पिटल सोलापूर शहराच्या मध्यवर्ती असून सुमारे ४ एकर एवढ्या जागेवर वसलेले आहे. फार पूर्वी सुद्धा इथे गॅमा कॅमेरा, सिटी स्कॅन, एम् . आर् . आय . सुविधा उपलब्ध होत्या .सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे रेल्वे स्टेशन पासून अगदी चालत येण्यासारख्या अंतरावर हे हॉस्पिटल असून इथे आजूबाजूच्या दक्षिण महाराष्ट्र, उत्तर कर्नाटका , तेलंगणा इथून लोक उपचारासाठी यायचे आणि आताही त्यांची इथे चांगली सोय होईल याची खात्री असल्याचा विश्वास गव्हर्निंग काऊन्सिलच्या सदस्यांनी व्यक्त केला. हॉस्पिटलच्या विकासासाठी समाजातील सर्वांच्या सहकार्याचे आवाहन केले.

या पत्रकार परिषदेस गव्हर्निंग काऊन्सिल सदस्य डॉ सुनील घाटे, डॉ . संदीप भागवत, राम रेड्डी,संजय पी. पटेल, ॲड. नितीन हबीब, सीए श्रीधर रिसबूड, डॉ. राजेंद्र घुली , डॉ. विजय सावस्कर, डॉ. सुनील मेहता, डॉ . शिरीष कुमठेकर, वासुदेव बंग, हेमंत चौधरी, कल्पेश जव्हेरी, गिरीश भुतडा उपस्थित होते, संस्थेचे अध्यक्ष म्हणून निवृत्त आयएएस अधिकारी प्रभाकर करंदीकर तर उपाध्यक्ष म्हणून उद्योगपती प्रेमरतन दमाणी कार्यरत आहे. शिवाय आयएएस अधिकारी प्रवीणसिंह परदेशी, पुण्याचे डॉ. आनंद भागवत व डॉ. अनिल बर्वे यांचा समावेश आहे.

# जिल्ह्यात राष्ट्रासाठी मध्यस्थी विशेष मोहिमेला सुरुवात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : न्यायालयीन प्रलंबित प्रकरणांमध्ये संवाद व सामंजस्याने तडजोड साधण्यासाठी राष्ट्रासाठी मध्यस्थी ही विशेष मोहिम सोलापूर जिल्हयात राबविण्यात येत आहे. मा. सर्वोच्च न्यायालय व राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या निर्देशानुसार दिनांक ०१ जुलै २०२५ ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत सदर मोहिम जिल्हा न्यायालय, सोलापूर व सर्व तालुका न्यायालयांमध्ये राबविण्यात येत आहे.

या मोहिमेअंतर्गत कौटुंबिक वाद, मोटार आपघात नुकसान भरपाई, चलनक्षम दस्ताऐवज कायद्याची प्रकरणे, दिवाणी दावे, वाणिज्यिक दावे तसेच इतर सर्व तडजोड योग्य दिवाणी व फौजदारी प्रकरणे मध्यस्थीच्या माध्यमातून निकाली काढण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.


मध्यस्थी ही न्यायालयीन प्रक्रियेपेक्षा जलद, कमी खर्चीक व गोपनीयता जपणारी पध्दत असून यात कोणत्याही पक्षावर निर्णय लादला जात नाही. न्यायालयात प्रलंबित असलेल्या व तडजोडी योग्य प्रकरणांमध्ये दोन्ही पक्ष आप-आपसात थेट संवाद साधून सामंजस्याने आपली समस्या सोडवू शकतात. सदर मोहिम मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर श्री मनोज एस. शर्मा, यांच्या नेतृत्वाखाली होत असून, मोहिमेचा लाभ जास्तीत जास्त पक्षकारांनी घ्यावा असे आवाहन करण्यात आले.

मध्यस्थीमध्ये स्वेच्छिक सहभाग, गोपनीयता राखली जाते, वेळ आणि खर्च वाचतो, सामंजस्यातून निर्णय, न्यायालयीन प्रक्रियेपेक्षा जलद प्रकरणाचा निपटारा होतो. ज्या पक्षकारांची प्रकरणे न्यायालयात प्रलंबित आहेत व ते सामंजस्यातून सदर प्रकरण मिटवू इच्छितात त्यांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर किंवा संबंधीत तालुका विधी सेवा समिती येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव मल्हार शिंदे यांनी केले आहे.

# पानमंगरुळ ग्रामदैवत श्री शेखबाबा यात्रेस १२ जुलै पासून सुरुवात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पानमंगरुळ/प्रतिनिधी : सालाबादाप्रमाणे यंदाही अक्कलकोट तालुक्यातील पानमंगरुळ चे ग्रामदैवत हजरत सय्यद दाऊद जलाल बुखारी ऊर्फ श्री शेखबाबा यांची यात्रा शनिवार दि. १२ जुलै ते सोमवार दि. १४ जुलै पर्यत यात्रा उरुस सुरु राहणार आहे. या कालावधीत विविध धार्मिक, सांस्कृतिक, संगीत कार्यक्रम संपन्न होणार आहे.



मंगळवार दि. ०८ जुलै रोजी रात्री संदल.

शनिवार दि. १२ जुलै रोजी पहिला दिवा (चिराग): सायं. ७ वाजता महादेव कोळी समाजाचे कंदुरीचे नेवैद्य, रात्री ८ वाजता गावचे पोलीस पाटील यांचे किस्ती, रात्री ९ वाजता देवीकवठा ग्रामस्थांकडून तेल अर्पण व रात्री १० वाजता पहिला दिवा (चिराग) भक्तांकडून लावण्यात येईल.

रविवार दि. १३ जुलै रोजी दुसरा दिवा (चिराग): पहाटेपासून दिवसभर सर्व गावकरी, महाराष्ट्र व कर्नाटक भाविकांकडून किस्ती, कंदुरीचे कार्यक्रम. दुपारी १२ वाजता कलगी तुरईचे गाण्याचे कार्यक्रम. रात्री ८ वाजता शमीर फादरी (पुणे) व शाहीद अजमेर (अहमदनगर) यांचे कव्वालीचे कार्यक्रम. रात्री १० वाजता दुसरा दिवा (चिराग) भक्तांकडून लावण्यात येईल.

सोमवार दि. १४ जुलै रोजी तिसरा दिवा (चिराग): सकाळी ९ वाजता कुराण पठण, दिवसभर किस्ती, कंदुरीचे कार्यक्रम. जियारत व प्रसाद वाटप. दुपारी १२ वाजल्यापासून कलगी तुरईचे गाणे. दुपारी ४ वाजता महाराष्ट्र व कर्नाटकातील नामवंत मल्लांचे कुस्ती. रात्री १० वाजता तिसरा दिवा (चिराग) भक्तांकडून लावण्यात येईल.

शनिवार दि. १९ जुलै रोजी बारा ऊरुस मंडप : विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम. सायं. ६ वाजता गुळ साखर प्रसाद वाटप कार्यक्रमांनी यात्रेची सांगता होणार आहे.

तरी जास्तीत जास्त भाविकांनी यात्रेत सहभागी होऊन यात्रेची शोभा वाढवावी असे आवाहन हजरत सय्यद दाऊद जलाल बुखारी (कादरी) दर्गा ट्रस्ट कमिटी व शेखबाबू यात्रा कमिटीने केले आहे.

रुग्णांना देखील काढावी लागते पाण्यातूनच वाट

नागरिकांतून संताप

# पडघा, भादाणे ब्रीज खाली साचले पाणी : नागरिकांना करावी लागते तारेवरची कसरत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील अर्जुनली व पडघा ग्राम पंचायतीच्या हद्दीतून गेलेल्या पडघा - भादाणे रस्त्यावर खड्डयामुळे पाणी साचल्याने वाहनचालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. पडघा गावातुन भादाणे, आतकोली, जुपाडा, चिराडपाडा, पडघा प्राथमिक आरोग्य केंद्र, शासकीय आश्रम शाळा येथे जाणाऱ्या अंडरपास व त्याच्या लगतच रस्त्यावर अनेक दिवसांपासून मोठे खड्डे पडले असुन ते पावसाच्या पाण्यामुळे भरल्याने त्यातुन वाट काढताना नागरीकांना, वाहनचालकांना, विद्यार्थ्यांना, रुग्णांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. पडघा, भादाणे ब्रीज खालील तसेच सर्विस रस्त्याची अतिशय दुरवस्था झाली असून नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. पडघा ही अनेक गावांची मुख्य बाजारपेठ व अनेक गावांचा केंद्रबिंदू असून अनेक गाड्यांची वर्दळ दिवसभरात सुरू असते. त्यात पावसाचे दिवस असल्याने रस्ताची चालणं होऊन मोठे खड्डे पडले असून नागरिकांना नाहक त्रास होताना दिसत आहे. तर संमधित पडघा टोल कंपनीचा याकडे दुर्लक्ष होत असून नागरिकांकडून नाराजी व्यक्त होतांना दिसत आहे. अनेक लोकप्रतिनिधी विविध राजकिय पक्षाचे पदाधिकारी मुबई नाशिक महामार्गावर जाण्यासाठी याच रस्त्याचा वापर करत असल्याने व बघुन सुध्दा त्यावर आवाज उठवत नसल्याने नागरीकांच्यात संतापाची लाट उसळली आहे. भादाणे ब्रिज खालून जाताना दुचाकी स्लिप होऊन अपघात होण्याची शक्यता स्थानिक नागरिकांकडून वर्तवली जात आहे. पडघा, भादाणे दिशेने जाणाऱ्या रस्त्याकडे संबंधीत विभाग लक्ष कधी देणार? खड्डे कधी बुजविणार? असा प्रश्न स्थानिक नागरिकांकडून व्यक्त होत आहे. सदर खड्डे हे मुबई नाशिक महामार्गालगत असलेल्या सर्वीस रस्त्यावर पडले असुन टोल वसुली करणाऱ्या कंपनीचा याकडे दुर्लक्ष होत आहे. असा सवाल नागरिकांमधून होत आहे. तर यावर कोणतीच उपाययोजना करत नसल्याने स्थानिक नागरिकांमधून



नाराजीचा सूड उमटत आहे. तर विविध ठिकाणी असलेले खड्डे बुजविण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

## श्री विठ्ठल रूक्मिणीमातेच्या दर्शनरांगेतील घुसखोरीबाबत, कंत्राटी कर्मचऱ्यांवर गुन्हा दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आषाढी यात्रा २०२५ सुरू असल्याने श्री विठ्ठल रूक्मिणी मातेच्या दर्शनरांगेत भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी आहे. या दर्शनरांगेत घुसखोरी होऊ नये म्हणून उपविभागीय दंडाधिकारी, पंढरपूर यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३(२) नुसार क्र.जबाबी/कावि/१७/२०२५ दि.१३/०६/२०२५ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश पारीत केला आहे. तथापि, दिनांक ०८ जुलै रोजी सकाळी ५.३० वाजता वा त्या सुमारास बीव्हीजी कंपनीचे सुरक्षा रक्षक काशिनाथ तारे यांनी श्रींच्या पदस्पर्शदर्शनरांगेत कासारघाट येथील आपत्कालिन मार्गातून दोन नातेवाईकांना दर्शनासाठी प्रवेश देऊन आदेशाचे उल्लंघन केल्याचे दिसून आले आहे.

या कर्मचा-याची आषाढी यात्रा २०२५ मध्ये तात्पुरत्या स्वरूपात दर्शनरांग द्रुतगतीने चालविण्यासाठी बीव्हीजी कंपनीने नियुक्ती केली होती. या कर्मचा-यावर पंढरपूर शहर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंद करण्यासाठी सुरक्षा विभाग प्रमुख राजाराम ढगे यांना प्राधिकृत करण्यात आले असून, श्री तारे यांचेवर गुन्हा नोंद करण्याची कार्यवाही सुरू आहे. याशिवाय, संबंधित कर्मचा-याची सेवा समाप्त करण्यात आली आहे. आषाढी यात्रेत झालेली गर्दी विचारात घेऊन, दर्शनरांग द्रुतगतीने चालून भाविकांचे सुलभ व जलद दर्शन होण्याच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत, अशा पध्दतीने घुसखोरी करणा-यावर मंदिर समितीने कठोर स्वरूपाची कारवाई करण्याची दक्षता घेतली असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगीतले.

# आरक्षणाचा लाभ अनुसूचित जातीतील अधिक गरजू युवकांना घेऊ द्यावा

## राज्यपाल सी पी राधाकृष्णन; पीपल्स एज्युकेशन सोसायटीचा ८० वा वर्धापन दिवस व पुरस्कार सोहळा राज्यपालांच्या उपस्थितीत संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
मुंबई/प्रतिनिधी

अनुसूचित जातीतील अधिकाधिक विद्यार्थ्यांनी आता गुणवत्तेवर प्रवेश तसेच नोकऱ्या मिळवण्याचा प्रयत्न करावा व आरक्षणाचा लाभ अनुसूचित जातीतील अधिक गरजू युवकांना घेऊ द्यावा, असे आवाहन राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी आज येथे केले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या पीपल्स एज्युकेशन सोसायटीचा ८० वा वर्धापन दिन राज्यपाल राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवारी (दि. ८ जुलै) यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे साजरा करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.

पीपल्स एज्युकेशन सोसायटी शैक्षणिक संस्था व वसतिगृहे निर्माण करून लाखो विद्यार्थ्यांना ज्ञानदान करण्याचे कार्य करीत असल्याबद्दल संस्थेचे अभिनंदन करताना आज अनुसूचित जातीतील अनेक विद्यार्थी आपल्या गुणवत्तेवर वैद्यकीय तसेच अभियांत्रिकी अभ्यासक्रमांना प्रवेश मिळवत असल्याचे राज्यपालांनी सांगितले. भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वप्न देखील हेच होते असे सांगून आरक्षण ही विकासाची किल्ली आहे, मात्र विद्यार्थी व युवकांनी आता जागतिक स्तरावर स्पर्धेसाठी तयार राहिले पाहिजे, असे राज्यपालांनी सांगितले.

सन २०४७ पर्यंत देश विकसित भारत म्हणून उदयास येईल व डॉ आंबेडकर यांचे स्वप्न साकार होईल, असा विश्वास व्यक्त करताना विकास हा सर्वसमावेशक होणे आवश्यक आहे असे राज्यपालांनी सांगितले.

यावेळी राज्यपालांच्या हस्ते संस्थेचे दोन माजी विद्यार्थी - राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील तसेच सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांसह विविध क्षेत्रात






### सोसायटीने स्वायत्त विद्यापीठ होण्याचा प्रस्ताव सादर करावा

उल्लेखनीय कार्य करणाऱ्या २० व्यक्तींना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार प्रदान करण्यात आले.

थप्पड देण्याची भाषा करण्यापेक्षा मुंबई शांत ठेवा केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

मराठी आमची मातृभाषा आहे. आम्ही सर्व .मराठी आहोत.मात्र भाषेचा दुराग्रह करताना परप्रांतियांना थप्पड मारण्याची भाषा योग्य नाही. थप्पड ला थापड ने उत्तर मिळते.मात्र वाद कोणी करू नये.मुंबई शांत ठेवावी. मुंबई देशाची आर्थिक राजधानी आहे.मुंबईची प्रतिमा कोणी खराब करू नये.राज्य सरकार प्रगती करीत पुढे चालले आहे.तसेच पीपल्स एज्युकेशन सोसायटी प्रगती करीत आहे.महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या पीपल्स एज्युकेशन सोसायटी चे देशभरात काम वाढत आहे असे पीपल्स एज्युकेश सोसायटी चे अध्यक्ष आणि केंद्रीय राज्यमंत्री ना. रामदास आठवले म्हणाले.

आपण पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या सिद्धार्थ महाविद्यालयाचे विद्यार्थी होतो याचा अभिमान वाटतो असे सांगून सोसायटीने आता स्वायत्त विद्यापीठ होण्याचा प्रस्ताव सादर करावा अशी सूचना उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केली. पीपल्स एज्युकेशन सोसायटी स्वायत्त विद्यापीठ झाल्यास संस्थेला नवनवीन अभ्यासक्रम राबवता करता येईल असे पाटील यांनी सांगितले.

सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी छत्रपती संभाजीनगर ही डॉ आंबेडकर यांची कर्मभूमी होती असे सांगून पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या मिलिंद महाविद्यालयाचे आपण माजी विद्यार्थी होतो असे सांगितले. आपण संस्थेच्या परिसर विकासासाठी यापूर्वीच भरघोस निधी उपलब्ध करून दिला असून व सामाजिक न्याय विभागातर्फे राज्यात १२० तीन तारांकित विद्यार्थी वसतिगृहे निर्माण करण्याचा मानस असल्याचे त्यांनी सांगितले.

केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले व संस्थेचे विश्वस्त ॲड. उज्वल निकम यांनी देखील यावेळी उपस्थितांना संबोधित केले.

यावेळी राज्यपालांच्या हस्ते ज्येष्ठ अभिनेते भाऊ कदम, अभिनेत्री क्रांती रेडकर, भदंत डॉ. राहुल बोधी, दक्षिण कोरिया येथील धम्मदीप भंते, उच्च शिक्षण संचालक शैलेंद्र देवळणकर, एड. सुरेंद्र तावडे, बळीराम गायकवाड यांना देखील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी सौ सीमाताई आठवले; रिपब्लिकन पक्षाचे राज्य कार्याध्यक्ष बाबुराव कदम; सरचिटणीस गौतम सोनवणे मुंबई प्रदेश अध्यक्ष सिद्धार्थ कासारे पप्पू कागदे; काकासाहेब खांबलकर ; कोकण अध्यक्ष प्रकाश मोरे सौ माधुरी चंद्रशेखर कांबळे; सोना कांबळे ; नागसेन कांबळे ; सुनील सर्वगोड ; आदी अनेक मान्यवर उपस्थित होते.

# कोठुरे स्वा. सावरकर विद्यालयात फुलला विठ्ठल भक्तीचा मळा





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
निफाड/प्रतिनिधी : मराठा विद्या प्रसारक समाज संचलित स्वातंत्र्यवीर सावरकर विद्यालय कोठुरे येथे आषाढी एकादशी निमित्ताने पालखी सोहळ्याचे व दिंडीचे आयोजन करण्यात आले होते.

यानिमित्ताने पालखीचे पूजन विद्यालयाचे मुख्याध्यापक सुनील सातपुते व शालेय समितीचे सदस्य प्रकाश कोरडे यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी माधवराव गीते तुषार जी मोगल पालक व ग्रामस्थ उपस्थित होते. भाऊसाहेब मोगल, प्रकाश कोरडे व मुक्ता ताई कडलग यांनी सकल महाराष्ट्राचे आराध्य दैवत असणाऱ्या पांडुरंगाच्या दर्शनासाठी जाणाऱ्या वारकऱ्यांची श्रद्धा ,परंपरा याविषयी माहिती दिली. याप्रसंगी शालेय गीतममंचाने अभंग सादरीकरण केले व विठ्ठल जयघोषाने व टाळ मृदुंगाच्या गजरात व लेझीम पथकाच्या तालात विद्यालयातील चिमुकल्या वारकऱ्यांची पायी दिंडी काढण्यात आली.

या दिंडी सोहळ्यात चिमुकल्यानी केलेली विठ्ठल रखुमाई ची वेशभूषा, वारकरी, टाळकरी यांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. या वेळी दिंडी सोहळ्यात रिंगण सोहळात विठ्ठल नामाच्या गजराने परीसर दुमदुमून गेला .यात सर्व विद्यार्थ्यांनी उस्फुर्त सहभाग घेतला.

कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी ,पालक उपस्थित होते .कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतिक समिती ने केले.प्रसंगी विद्यालयातील कला शिक्षिका श्रीमती जाधव जी व्ही यांनी साकारलेले शब्दचित्र हेही आजच्या सोहळ्याचे आकर्षण ठरले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार सांस्कृतिक समितीचे प्रमुख निकम सुधाकर यांनी केले.

# वागदरी जिल्हा परिषद शाळेत साहित्य वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
अक्कलकोट/प्रतिनीधी : वागदरी गावचे सुपुत्र श्री प्रकाश चंद्रकांत मगाणे यांच्या कडुन जिल्हा परिषद प्राथमिक मराठी मुलींची शाळा वागदरी येथे शाळेतील विद्यार्थीना शैक्षणिक साहित्य वाटप सरपंच शिवानंद घोळसगाव, वीरभद्र मागणे, सुनील सावंत यांच्या हस्ते २० गरीब मुलींना शालेय बॅग व सर्व ११५ मुलींना वही पेन पेन्सिल वाटप करण्यात आले यावेळी श्री प्रकाश मंगाणे यांची कन्या कु. अद्वीका प्रकाश मंगाणे यांच्या उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच श्री शिवानंद घोळसगाव यानी भूषविले सर्वप्रथम क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले कार्यक्रमांची प्रस्तावना मुख्याध्यापक श्री बाबासाहेब बनसोडे यांनी करून कार्यक्रमास सुरुवात केली कार्यक्रमास प्रमुख अतिथी सौ. रेखा प्रकाश मंगाणे, सौ अंजली दत्ता मंगाणे, ग्रामपंचायत सदस्य विरभद्र मंगाणे, सुनील सावंत, रमेश मंगाणे, वागदरी केंद्राचे केंद्र प्रमुख मुनोळी सर, टायगर ग्रुप अध्यक्ष शरण माशाळे, श्री नागेश स्वामी, सोहिल नदाफ, सर्व प्रमुख अतिथी यांचे शाळे तर्फे यथोचित असा शाल पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष लक्ष्मी दुर्गे, मुख्याध्यापक बाबासाहेब बनसोडे सर, सहशिक्षिका गिरी मॅडम,फंड मॅडम, सुरवसे मॅडम, यांनी परिश्रम घेतले सुत्रसंचलन शिवशरणप्पा सुरवसे यांनी केले आभार मुख्याध्यापक बाबासाहेब बनसोडे सर यांनी मानले



# अभिनव नांदुर्डी शाळेत विठू नामाचा गजर करत बालगोपालांचा रंगला दिंडी सोहळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
निफाड/प्रतिनिधी : मराठा विद्या प्रसारक समाज नाशिक संचलित, अभिनव बाल विकास मंदिर नांदुर्डी शाळेत, आषाढी एकादशीच्या निमित्ताने विद्यालयात बाल दिंडीचे आयोजन करण्यात आले असून पालखीचे पुजन विद्यालयाचे प्राचार्य म्हसकर बी डी, अभिनवचे मुख्याध्यापक शिंदे व्ही. यू., अभिनव स्कूल कमिटी अध्यक्ष सिताराम ढोमसे, माध्यमिक स्कूल कमिटी अध्यक्ष बोराडे तात्या व उच्च माध्यमिक स्कूल कमिटी अध्यक्ष एकनाथ निकम यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शाळेतील सर्व



विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांची वेशभूषा केली. हातामध्ये भगव्या पताका, गळ्यामध्ये टाळ, कपाळी टिळा.....डोक्यावरी तुळस मुखाने हरिनामाचा गजर करत बालवारी नांदुर्डीच्या मुख्य रस्त्यावरून भव्य दिंडी सोहळा काढण्यात आला, नांदुर्डी नगरी अभिनवच्या चिमुकल्यांनी भक्तिमय करून टाकली. अभंगाच्या तालावर चिमुकल्यानी रिंगण सोहळा पार केला. यावेळी नांदुर्डी गावातील भजनी मंडळ व नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. चिमुकल्यांचे ते वारकरी रुप बघुन उपस्थितांनी कौतुक केले,. टाळ मृदंगाच्या गजरात संपुर्ण परीसर विठ्ठल मय झाला होता. तुकाराम ज्ञानेश्वर विठ्ठल कृष्ण असे वेगवेगळे वेशभूषा केलेले विद्यार्थी विद्यार्थिनींनी सर्वांचे लक्ष वेधले यावेळी अनेक महिलांनी पालखीचे पूजन केले. व बालगोपालांना प्रसादरुपी बिस्किट चॉकलेटचे वाटप केले. शालेय आवारात पुन्हा रिंगण करून वारीची सांगता करण्यात आली. सदर कार्यक्रमासाठी अभिनवचे मुख्याध्यापक शिंदे व सांस्कृतिक विभाग प्रमुख श्रीमती जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. सदर वारीचे नियोजनबद्ध आयोजन आहेर एस बी, कुशारे एस एम, श्रीम गुरगुडे ए एम, साबळे वाय एस, कदम एस डी, घोडेकर एस आर निचीत जे आर, कुशारे एम जे, ठोंबरे ए ए, यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

**वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळा कार्यक्रम**

# लोणारी पाऊल पडते पुढे, प्रवाशांची गरज ओळखत आरामदायी बसची सोय : उपाध्यक्ष बाळासाहेब आटपाडकर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
वरकुटे मलवडी/प्रतिनिधी : जांभूळणी ता . माण येथील रहिवाशी आणि भोजलिग कुस्ती संकुल चे वस्ताद युवा उद्योजक सचिन शेट नरळे यांनी प्रवाशांच्या सोयीसाठी भारत बेंझ कंपनीच्या आरामदायी दोन ट्रॅव्हल्स खरेदी केल्या या बसेस चे उद्घाटन व पूजन बाळासाहेब आटपाडकर युवा नेते ऋषिकेश जगताप जांभूळणी गावचे सरपंच भारत काळेल उपसरपंच सिध्देश्वर तोरणे व सर्व माजी सरपंच चेअरमन व प्रवाशी नागरिक पंचक्रोशीतील ग्रामस्थ यांच्या शुभ हस्ते शुभारंभ करण्यात आला या ट्रॅव्हल्स पंढरपूर ते अहमदाबाद या प्रवासासाठी सज्ज केल्या असून याचा प्रवाश्यानी लाभ घ्यावा असे आवाहन लोणारी समाज सेवा संघ मुंबई चे उपाध्यक्ष बाळासाहेब आटपाडकर यांनी केले.

यावेळी या बसेस पूर्ण वातानुकूलित स्लीपर कोच सर्व सुविधा युक्त आरामदायी असून कमी दरात सेवा देण्याचा मानस असून जास्त लांबीचा प्रवास सुखकर व्हावा म्हणून ही सुविधा उपलब्ध केली आहे यावेळी मा चेअरमन धनाजी काळेल मां सरपंच भारत काळेल, सिध्देश्वर काळेल, शहाजी काळेल गजेंद्र काळेल, विक्रम कोकरे, पिंटू काळेल, युवराज काळेल, दिलीप खरात प्रा काशिनाथ आटपाडकर युवा नेते प्रशांत आटपाडकर, पोपट शेट आटपाडकर, भोजलिंग तालीम चे सर्व पैलवान उपस्थित होते. यावेळी बाळासाहेब आटपाडकर म्हणाले की आपल्या आसपास कोठेही अशी भारत बेंझ कंपनीची आरामदायी प्रवाशी बस नाही. सचिन यांनी भोजलींग् देवाच्या आशीर्वादाने या बसेस खरेदी केल्या हे धाडस फार मोठे आहे हे सचिन नरळे यांनी स्वप्न पूर्ण केले याला सहकार्य करण्याची पूर्ण जबाबदारी आपल्या सर्वांची आहे असे आवाहन केले.

ही बस दुपारी चार वाजता पंढरपूर येथून निघणार असून महुद दिघची वरकुटे म्हसवड दहिवडी सातारा पुणे मार्गे जात असून व्यवस्थापक यांच्याची संपर्क साधावा.



# मनपा डिजिटल स्कूल २८ नंबर आनंदवारी उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
सोलापूर/प्रतिनिधी : मनपा मराठी मुलांची शाळा क्रमांक २८ सुंदरम नगर विजापूर रोड सोलापूर या शाळेचे आषाढी एकादशी दिंडी शाळेच्या प्रभागात उत्साहामध्ये काढण्यात आले यावेळी साक्षरतेची दिंडी साक्षरते बाबत जनजागृती करत तसेच पर्यावरणाचे समतोल राखण्यासाठी पर्यावरण पूरक असे दिंडी काढण्यात आले. या दिंडीचे उद्धाटन पूजन पर्यवेक्षिका रजनी राऊळ, राजेंद्र लिबितोटे, संजय देडे, सौ प्रियांका माने, मुख्याध्यापक परमेश्वर सुतार, इत्यादी मान्यवरांच्या हस्ते पालखीचे पूजन करण्यात आले.

बाल चिमुकल्यांचा विठ्ठल रखुमाई संत तुकाराम संत वासुदेव संत ज्ञानेश्वर जनाबाई वेशभूषा दिंडीची आकर्षण ठरले विठ्ठलाचा गजर करत श्री स्वामी समर्थ देवळाकडे रवाना झाले या दिंडीतून साक्षात विठ्ठलाचे दर्शन होत होते बाल चिमुकल्यांची दिंडी पाहण्यासाठी सुंदरम नगर परिसरातील नागरिक पालक श्री स्वामी समर्थ मंदिराकडे महिलांनी शिक्षकांनी फुगडी खेळत होते. मुख्याध्यापक परमेश्वर सतार सर, सहशिक्षक गौरीशंकर नारायण, सीमा जाधव, अलका कांबळे, स्नेहल खराटे, गणेश अजिंखाने, लक्ष्मी भिमथी, अंजली जाधव, मेनका चव्हाण, पल्लवी ककमारे, पुनम बोराळकर, प्रियांका नरोटे ही दिंडी यशस्वी होण्यासाठी मुख्याध्यापक स्वतः सर व त्यांची सर्व शिक्षक वर्ग व माता-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.